दिनांक १८/०८/२०२२

-:- प्रेसनोट-:-

**तक्रारदार यांनी दिलेल्या एन.सी.तक्रारारीवर कठोर कारवाई करण्यासाठी पोउपनि.पो.स्टे.जवाहरनगर श्री. शेळके यांना सांगुन मदत करतो असे म्हणुन खाजगी व्यक्ती यांनी प्रथम 10000/- रुपये व तडजोडीअंती 7000/- रुपये लाचेची मागणी केली म्हणून गुन्हा.**

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | औरंगाबाद |
| गुन्हा नोंद क्रं. | :- | पोलीस ठाणे जवाहरनगर औरंगाबाद शहर गु.र.नं.207/2022 कलम 7A भ्र.प्र.अधि.1988. |
| आरोपी लोकसेवक यांचे नाव हुद्दा व पत्ता | :- | श्री.कासम उस्मान शेख, वय 45 वर्ष, रा. नुराणी मस्जीद समोर, गारखेडा औरंगाबाद. (खाजगी व्यक्ती) |
| लाच मागणी रक्कम | :- | 10000/- रुपये तडजोडी अंती-7000/- रुपये. |
| लाच स्विकृती रक्कम | :- | निरंक |
| तपास अधिकारी | :- | श्री. हनुमंत वारे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| थोडक्यात माहिती | :- | यातील तक्रारदार यांनी दि.26/7/2022 रोजी पो.ठाणे जवाहरनगर औरंगाबाद शहर येथे गल्लीत शेजारी राहणारे श्री. मुख्तार शेख यांचे विरुध्द एन.सी. दाखल केली होती. सदर एन.सी.ची चौकशी पोउपनि. शेळके यांचेकडे होती. त्याअनुषंगाने खाजगी इसम कासम शेख यांनी एन.सी.मध्ये कारवाई करण्यासाठी पोउपनि. शेळके यांना सांगुन मदत करतो असे म्हणुन 10,000 रुपये लाचेची मागणी करित असल्याने, तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, त्यांनी दि. 03/08/2022 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद या कार्यालयात तक्रार दिली.<br>तक्रारदार यांचे तक्रारीवरुन दि.03/08/2022 रोजी केलेल्या पडताळणी दरम्यान खाजगी इसम यांनी तक्रारदार यांना रुपये 10,000/- लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 7000/- रुपये पंच साक्षीदारांसमक्ष स्विकारण्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर खाजगी इसम यांना तक्रारदार यांनी संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता आरोपी खाजगी इसम यांनी तक्रादार यांचा फोन उचलला नाही व भेट घेतली नाही. खाजगी इसम यांना तक्रारदार यांचेवर संशय आल्याने त्यांनी लाचेची रक्कम स्विकारली नाही.<br>दिनांक 17/08/2022 रोजी खाजगी इसम यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पोलीस स्टेशन जवाहरनगर औरंगाबाद शहर गु.र.नं.207/2022 कलम 7A भ्र.प्र.अधि.1988 प्रमाणे लाच मागणी केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. |

सदर कारवाई, पोलीस अधीक्षक मा.डॉ.राहुल खाडे, अपर पोलीस अधीक्षक मा. विशाल खांबे, पोलीस उप अधिक्षक श्री. मारुती पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक- श्री. हनुमंत वारे यांनी कारवाई केली आहे. त्यांना सदरच्या कारवाई कामी पोअं- साईनाथ तोडकर, सुनिल पाटील, विलास चव्हाण, चालक-चंद्रकांत बागुल यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

| | |
|---|---|
| संपर्क पत्ता | :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| ई- मेल | :- sp1acbaurangabad@gmail.com. 2) dyspacbabad@gmail.com |
| ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन | :- acbmaharashtra.net |
| फेसबुक | :- www.facebook.com-Maharashtra.gov.in |
| संपर्क क्रं. | :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064, |
| पोलीस अधीक्षक | :- 8888807299 |
| अपर पोलीस अधीक्षक | :- 8788644994 |
| पोलीस उप अधीक्षक | :- 9356115189 |

(मारुती शंकर पंडित)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद.